# NATIONAL INTEGRATED MEDICAL ASSOCIATION

*MAHARASHTRA STATE BRANCH*

*(All India Organisation of Graduates of Integrated Medicine )*

*Regd. Under Societies Registration Act of 1860, Reg. No. BOM/282/71GBBSD) RPT. No. F/2469 Mum.*

PRESIDENT - DR. MANOHAR M. JUMLE 43, Wanzari Nagar, NAGPUR- 440009. Mob. - 9373108405 / (0712) 2754373

GEN.SECRETARY - DR.SHAILESH S. NIKAM, 8, Sairaj Apt., Ashoka Marg, B/H Fame Cinema, Pune Road, NASHIK- 422011. Mob. - 9423972131

TREASURER - DR. RAJARAM H. JADHAV Main Road, A/P MADALMOHI, Tal Gevrai, Dist Beed - 431127. Mob. - 9604452159 / 9850244594


*जा.क्र. NIMA/MSB/GS/09/5240/2012-14* **Date - 03 September 2014**

प्रति,

मा. सदस्य

एन. आय.एम.ए.

विघ्नहर्त्याच्या आशिर्वादाने आपल्या जीवनातील सर्व विघ्ने दुर व्हावी ही प्रार्थना !

अत्यंत महत्वाचे -

महाराष्ट्रातील आयुर्वेद व युनानी पदवी व पदव्युत्तरधारकांना Allopathy चिकित्सा प्रणाली वापरण्याचा अधिकार शासकिय परिपत्रक १९९२ व १९९९ नुसार प्राप्त झाला होता त्याचे दि. २६ जुन २०१४ रोजी शासकिय परिपत्रकाद्वारे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीनंतर MMP Act 1961 मधील कलम २५ मध्ये मुद्दा क्र. ४ व ५ चा समावेश करून कायद्यात रूपांतर महाराष्ट्र शासनाने केले. यासाठी एन.आय.एम.ए. संघटनेने २५ वर्षापासुन पाठपुरावा करून विशेष परिश्रम घेतले.

परंतु दि. ०८ ऑगस्ट २०१४ रोजी IMA पुणे शाखेने महाराष्ट्र शासन, CCIM, MCIM यांच्याविरोधात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. या याचिकेत १९९२, १९९९ चे परिपत्रक व सुधारित कायदा रद्द करण्याची मागणी IMA तर्फे करण्यात आलेली आहे. सदर याचिका न्यायालयात ग्राह्य मानून सदर निर्णयांना stay मिळाल्यास सर्व आयुर्वेद व युनानी पदवीधारकांचा Allopathy वापरण्याचा अधिकार मा. न्यायालयाचा निर्णय येईपर्यन्त स्थगित होऊ शकतो.

दि. २५ ऑगस्ट २०१४ रोजी ही याचिका न्यायालयात रजिस्टर झालेली आहे. न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी ०८ ऑक्टोबर २०१४ ही तारीख दिली होती. परंतु IMA ने अत्यंत अत्यावश्यक यासदराखाली emergency bench समोर ते मांडले व त्यासाठी तातडीने म्हणुन ०१ सप्टेंबर २०१४ रोजीच प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे.

या सर्व बाबींवर NIMA महाराष्ट्र राज्य शाखेने बारकाईने लक्ष ठेवलेले असुन सदर प्रकरणात आयुर्वेद व युनानी पदवीधारकांची भुमिका न्यायालयासमोर मांडण्यासाठी न्यायालयात याविषयात NIMA महाराष्ट्र राज्य शाखा Interven झालेली आहे. सदर प्रसंगी न्यायालयात NIMA राज्य शाखेचे अध्यक्ष डॉ. मनोहर जुमळे, सचिव डॉ. शैलेश निकम, डॉ. विनायक टेंभूर्णीकर, डॉ. विनायक म्हात्रे, डॉ. कैलास गौड, डॉ. के.टी. पाटील, डॉ. राजेन्द्र खटावकर. डॉ. मंदार रानडे, डॉ. मिलिंद कुलकर्णी, डॉ. मुश्ताक मुकादम, डॉ. गणपत्ये, डॉ. अरगडे, डॉ. अभिनंदन पाटील, डॉ. आंग्रे हजर होते. निमा संघटनेच्या वतीने मुबई उच्च न्यायालयातील अड. श्रीकांत गावंड, ज्येष्ठ विधितज्ञ अड. कुंभकोणी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर न्यायालयीन प्रक्रियेमध्ये सर्व कायदेशीर व इतर अत्यावश्यक बाबी पहाण्यासाठी एन.आय.एम.ए. राज्य शाखेने अध्यक्षांच्या आदेशान्वये डॉ. मनोहर जुमळे, डॉ. शैलेश निकम, डॉ. विनायक म्हात्रे, डॉ. मंदार रानडे, डॉ. के.टी. पाटील, डॉ. नितीन कोथळे व डॉ. मिलिंद कुलकर्णी यासदस्यांची एक समिती गठित केलेली आहे.

या सर्व न्यायालयीन कामकाजासाठी मोठा आर्थिक निधी आवश्यक असुन आपल्या पदवीधारकांचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी तीव्र लढा सर्वांनी सोबत येऊन देणे अत्यावश्यक आहे. अधिक माहितीसाठी आपल्या स्थानिक निमा शाखेच्या पदाधिका-यांशी संपर्क साधावा.

आपला

डॉ. शैलेशकुमार शि. निकम

सचिव - निमा महाराष्ट्र राज्य शाखा